# पुणे विद्यापीठ

दूरध्वनी क्र.: ०२०-२५६०११८५/८६
फॅक्स : ०२०-२५६९७३८८
संकेतस्थळ : www.unipune.ac.in

प्रशासन शिक्षकेतर कक्ष
गणेशखिंड, पुणे - ४११ ००७

संदर्भ क्र. ए एन - 4228

दिनांक : 16 NOV 2011

१. मा.प्राचार्य, सर्व संलग्न महाविद्यालये
२. मा.संचालक, सर्व मान्यताप्राप्त संस्था
३. मा.विभाग प्रमुख, प्रशासकीय/ शैक्षणिक विभाग

***विषय :- गुणवंत शिक्षकेतर सेवक (विद्यापीठ / महाविद्यालये) पुरस्कार २०१२...***

महोदय/ महोदया,

विद्यापीठ अधिकार मंडळाने घेतलेल्या निर्णयानुसार दरवर्षी १० फेब्रुवारी रोजी पुणे विद्यापीठाच्या वर्धापन दिनी **"गुणवंत शिक्षकेतर सेवक (विद्यापीठ) पुरस्कार"** व **"गुणवंत शिक्षकेतर सेवक (महाविद्यालये) पुरस्कार"** देण्यात येत आहे. फेब्रुवारी, २०१२ च्या पुरस्कारासाठी विद्यापीठाच्या संकेतस्थळावर उपलब्ध असलेल्या विहीत नमुन्यातील प्र-पत्रात तपशीलासह माहिती मागविण्यात येत आहे.

**"गुणवंत शिक्षकेतर सेवक पुरस्कार"** साठी शिफारस करताना सोबत स्वयंमुल्यांकन, प्रतिवेदन प्र-पत्र ही माहिती संबंधितांकडून भरुन घेऊन आपल्यामार्फत पाठवावी. दिनांक १० फेब्रुवारी, २०१२ या दिवशी द्यावयाच्या पुरस्कारासाठी **पुणे शहर व नगर जिल्हयाकरिता वर्ग ३** व **पुणे जिल्हा व नाशिक जिल्हयाकरिता वर्ग ४** आणि **पुणे विद्यापीठकरिता वर्ग ४** या प्रमाणे शिफारशी पाठविण्यात याव्यात.

संबंधित सेवकाने माहिती भरल्यानंतर मा.प्राचार्य / मा.संचालक, मा.विभागप्रमुख, प्रशासकीय/ शैक्षणिक विभाग यांनी माहितीची शहानिशा करुन आपल्या अभिप्रायासह सोबत जोडलेला प्रतिवेदन अहवाल गोपनीयरीत्या शनिवार, दिनांक ३१ डिसेंबर, २०११ पर्यंत मा.कुलसचिव, पुणे विद्यापीठ, गणेशखिंड, पुणे ७ यांच्या नावे पाठवावा. उशिरा आलेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही.

सदर अहवाल पाठविताना लिफाफ्यावर **"गुणवंत शिक्षकेतर सेवक - स्वयंमुल्यांकन, प्रतिवेदन अहवाल"** असा स्पष्ट उल्लेख करावा. सदर पत्र व त्या सोबतचे नियम व अटी, स्वयंमुल्यांकन व प्रतिवेदन प्र-पत्र विद्यापीठाच्या www.unipune.ac.in या संकेतस्थळावर Current News व Circulars/ Tenders या सदराखाली उपलब्ध आहे.

कळावे,

आपला,

**(डॉ. मा. ल. जाधव)**
कुलसचिव

सोबत :- वरीलप्रमाणे.

1/F:/MD/2012/SK/Puras/Gun 2012

# पुणे विद्यापीठ

## नियम व अटी

## गुणवंत शिक्षकेतर सेवक (विद्यापीठ व महाविद्यालये) पुरस्कारासाठी नियम व अटी.

१) हा पुरस्कार शैक्षणिक वर्ष २००४-२००५ पासून सुरू करण्यात आलेला आहे.

२) दरवर्षी १० फेब्रुवारी या विद्यापीठ वर्धापन दिनी हा पुरस्कार प्रदान करण्यात येईल.

३) पुरस्कारासाठी प्रमाणपत्र, रू.७५००/- चा धनादेश व स्मृतीचिन्ह देवून सन्मानित करण्यात येईल.

४) हा पुरस्कार विद्यापीठामध्ये वर्ग ३ व वर्ग ४ मधून (तांत्रिक व अतांत्रिक) देण्यात येईल.

५) महाविद्यालयामध्ये रजिस्ट्रार/प्रबंधक सोडून अन्य वर्ग ३ व वर्ग ४ मधील सेवकांमधून देण्यात येईल.

६) सेवकाने सोबतचे मूल्यांकन व स्वयंमूल्यांकन अहवाल ३ आठवडयाच्या आत सादर करणे आवश्यक आहे.

७) एकाच सेवकाची या पुरस्कारासाठी शिफारस करण्यात यावी. शिफारस करतेवेळी विद्यापीठाच्या शैक्षणिक/प्रशासकीय विभागातील प्रमुखांनी व महाविद्यालयाचे संदर्भात प्राचार्यांनी त्यांचे स्पष्ट अभिप्राय गोपनीयरीत्या द्यावेत.

८) दिनांक १० फेब्रुवारी, २०१२ रोजी पुणे शहर व नगर जिल्हयाकरीता वर्ग ३, पुणे जिल्हा व नाशिक जिल्हयाकरीता वर्ग ४, पुणे विद्यापीठाकरीता वर्ग ४ या प्रमाणे पुरस्कार देण्यात येतील व पुढील वर्षी वर्ग ४ चे ठिकाणी वर्ग ३, वर्ग ३ चे ठिकाणी वर्ग ३ याप्रमाणे अदलाबदलीने पुरस्कार देण्यात येतील.

९) पुरस्कार विभागून देण्यात येणार नाही.

१०) ज्या सेवकांची शिफारस केली जात आहे, त्यांनी यापूर्वी प्राप्त केलेले पुरस्कार, बक्षीसे, विशेष कामासंदर्भात गौरविले असेल, त्या पुरस्कार/प्रमाणपत्राच्या छायांकित प्रती जोडणे आवश्यक राहील.

११) सेवक सेवेत कायम असावा.

१२) सेवकास शिक्षा झालेली नसावी. त्यांचेवर कोणतीही विभागीय चौकशी चालू नसावी किंवा कारवाई झाली नसावी किंवा कोणतेही आरोप ठेवलेले नसावेत.

१३) सेवकाचे बाबतीत कोणताही नैतिक अध:पतनचा गुन्हा शाबीत झाला नसावा/चालू नसावा अथवा त्यांचेवर कोणतीही कार्यवाही चालू नसावी.

१४) मा.विभागप्रमुखांनी/प्राचार्यांनी दिलेली माहिती ग्राहय धरण्यात येईल.

१५) अधिक तपशीलासाठी आवश्यक ती प्रमाणपत्रे जोडण्यास हरकत नाही.

१६) आवश्यक सेवेचा अनुभव व वयाचा पुरावा दाखविणारी कागदपत्रे सोबत जोडणे आवश्यक आहे.

१७) पुणे शहर, पुणे जिल्हा, नगर जिल्हा, नाशिक जिल्हा प्रत्येकी एक, व पुणे विद्यापीठ एक याप्रमाणे पुरस्कार देण्यात येतील.

१८) एका जिल्हयातून अथवा पुणे शहरातून अथवा पुणे विद्यापीठातून एकापेक्षा जास्त सेवक निवड समितीने या पुरस्कारासाठी सक्षम असल्याची शिफारस केल्यास अपवादात्मक परिस्थितीनुरूप पुरस्कारांची संख्या वाढविण्यात येईल.

१९) पुरस्काराचा धनादेश, रोख रक्कम व स्मृतीचिन्ह समक्ष घेऊन जाणे आवश्यक आहे. पुरस्कार, धनादेश, रोख रक्कम, स्मृतीचिन्ह व प्रमाणपत्र पोस्टाने पाठविता येणार नाही.

२०) छाननी समितीमध्ये असलेल्या सदस्यांबाबत आक्षेप विचारात घेतले जाणार नाहीत.

२१) विद्यापीठातील कक्षाधिकारी व त्यावरील पदे, महाविद्यालयातील प्रबंधक व त्यावरील पदे यांची शिफारस केल्यास त्यांचा विचार करण्यात येणार नाही.

२२) संबंधित महाविद्यालयांनी/विभागप्रमुखांनी त्यांच्याच नियंत्रणाखालील महाविद्यालयातील/विभागातील केलेल्या शिफारशी ग्राहय धरल्या जातील. अन्य महाविद्यालय/विभागाच्या यामधील शिफारस केल्यास अथवा अन्य विभागातील शिफारशी केल्यास त्याचा विचार केला जाणार नाही. संबंधित महाविद्यालयांनी/विभागप्रमुखांनी त्यांच्या नियंत्रणाखालील महाविद्यालयातील/विभागातील केलेल्या शिफारशी ग्राहय धरल्या जातील. छाननी समितीस आवश्यकता वाटल्यास माहिती तपासण्याचे अधिकार समितीस राहतील.

२३) संबंधित महाविद्यालयाच्या प्राचार्यांनी/विद्यापीठातील विभागप्रमुखांनी त्यांच्याच नियंत्रणाखालील महाविद्यालयातील / विभागातील केलेल्या शिफारशी ग्राहय धरल्या जातील. अन्य महाविद्यालय/ विभागातील सेवकाची शिफारस केल्यास अथवा अन्य विभागातील सेवकाची शिफारस केल्यास त्याचा विचार केला जाणार नाही.

२४) संबंधित महाविद्यालयाच्या प्राचार्यांनी /विद्यापीठातील विभागप्रमुखाने त्यांच्या नियंत्रणाखालील काम करीत असलेल्या सेवकाची पुरस्कारासाठी दिलेली माहिती ग्राहय धरण्यात येईल. छाननी समितीस सदरची माहिती तपासण्याचे संपूर्ण अधिकार राहतील.

२५) आवश्यक त्या माहितीचा अर्जात अभाव आढळल्यास निवड समिती अशा अर्जांचा विचार करणार नाही.

२६) काही अपरिहार्य कारणाने पुरस्कार प्राप्त सेवकास वर्धापनदिनी उपस्थित राहता आले नाही तर त्याची सूचना देवून विद्यापीठ कार्यालयातून समक्ष पुरस्कार घेऊन जावा.

२७) दिलेल्या प्रमाणपत्राचा व अन्य स्मृतीचिन्ह याचा गैरवापर होणार नाही याची दक्षता पुरस्कार प्राप्तांनी घेणे आवश्यक आहे.

२८) महाविद्यालयांकडून, संस्थांकडून व विद्यापीठाकडून प्राप्त होणा-या अर्जांची छाननी करण्यासाठी व सेवकाची शिफारस करण्यासाठी खालीलप्रमाणे समिती राहील. :-

१. मा.कुलगुरू यांनी नामनिर्देशित केलेले मा.व्यवस्थापन परिषदेचे सदस्य (एक)- (अध्यक्ष)

२. मा.कुलगुरू यांनी नामनिर्देशित केलेले प्राचार्य (एक)

३. मा.कुलगुरू यांनी नामनिर्देशित केलेले प्रशासकीय क्षेत्रातील अनुभवी व्यक्ती (एक)

४. मा.कुलगुरू यांनी नामनिर्देशित केलेले शैक्षणिक क्षेत्रातील तज्ज्ञ व्यक्ती (एक)

५. मा.कुलसचिव

२९) सेवक सेवेत असताना जास्तीत जास्त तीनदा पुरस्कारास पात्र असेल. तथापि एकदा पुरस्कार मिळाल्यानंतर पुढील तीन वर्षे पुरस्कारास पात्र असणार नाही.

३०) वरील व्यतिरिक्त परिस्थितीच्या तपशीलानुसार आणि वरील नियमांचे अर्थ लावण्याचे अधिकार मा.कुलगुरू यांना राहतील.

*   *   *   *   *

## 'गुणवंत शिक्षकेतर सेवक' पुरस्कारासाठी मूल्यांकन प्रतिवेदन

मा.प्राचार्य/मा.विभागप्रमुखांनी सादर करावयाचा अहवाल.

### सेवकाची वैयक्तिक माहिती

अ) सेवकाचे नांव :- ------------------------------------------

कायमचा पत्ता :- ------------------------------------------

------------------------------------------

जन्मतारीख व वय:- ------------------------------------------

महाविद्यालय/विद्यापीठ विभाग:- ------------------------------------------

सध्या धारण करीत असलेले पद व वर्ग :------------------------------------------

प्रथम रूजू दिनांक व त्या वेळचे पद :- ------------------------------------------

एकूण सेवा कालावधी :- ------------------------------------------

कोणकोणत्या पदावर व किती वर्षे सेवा झाली :- ------------------------------------------

शैक्षणिक अर्हता ------------------------------------------

ब) इतर

मागील तीन वर्षांचे गोपनीय अहवालाचा दर्जा :- ------------------------------
(वर्षनिहाय)

सेवकाची विश्वासार्हता :- ------------------------------

सेवकाविरूध्द कोणता गुन्हा नोंदविला होता का? ------------------------------
सेवाकालावधीत शिक्षा झाली का?

क्राईम-ऑफेन्स/नैतिक अध:पतनविषयक
गुन्हा शिक्षेचे स्वरूप :- ---------------------------
सर्वसाधारण वर्तणुकीबाबत अभिप्राय :- ---------------------------

उद्योगप्रियता :- ---------------------------

कार्यतत्पर आहे काय ? :- ---------------------------

कामातील अचूकता :- ---------------------------

कामात नियमितपणा :- ---------------------------

सहभागाची भावना :- ---------------------------

कामात व्यवस्थितपणा :- ----------------------------------

उपस्थिती :- ----------------------------------

वरिष्ठांशी वर्तणूक :- ----------------------------------

सहका-यांशी वर्तणूक :- ----------------------------------

समाजात मान/प्रतिष्ठा :- ----------------------------------

कामाची विश्वासार्हता :- ----------------------------------

कामाची सखोल माहिती :- ----------------------------------

कार्यालयीन कामाची आत्मियता :- ----------------------------------

संगणकाचे ज्ञान :- ----------------------------------

विद्यार्थी, पालक व समाज यांच्याशी असलेले संबंध :- --- ---------------------------

सहकार्याची भावना :- ------------------------------

इतर काही बक्षीसे, पारितोषिके सन्मान मिळालेले

आहेत का ? असल्यास त्याच्या छायांकित प्रती :- ------------------------------

जोडाव्यात.

कार्यरत असताना गौरवास्पद घटना घडली :- ------------------------------
असल्यास उल्लेख करावा.

विभागीय चौकशी व न्यायालयीन कारवाई चालू आहे का :-------------------------

प्रतिष्ठित सन्माननीय व्यक्तींनी दिलेली पुरस्कार पत्रे :- ---------------------------
(निवडक पत्रे जोडावीत)

खेळामध्ये आवड आहे का/कोणत्या :- ---------------------------

विद्यापीठ/महाविद्यालय/संस्थेबद्दल बांधिलकी :- ---------------------------
(थोडक्यात अभिप्राय)

क्रीडा, संगीत, साहित्य, लेखन, वाचन, सांस्कृतिक :- ---------------------------
कार्यक्रम इ.सहभाग

गणवेश नियमित वापरतात का ?(वर्ग ४ साठी) :- --------------------------

**प्राचार्यांचे सेवकाबाबतचे मुल्यांकन** :- -----------------------------
**(योग्य त्या समर्थनासह)**

**वरील माहिती व्यतिरिक्त काही सांगावयाचे असल्यास :-** -----------------------------
**शिफारस**

वरील माहिती उपलब्ध कागदपत्रे, प्रत्यक्ष पाहणी व अन्य माध्यमातून ज्ञात आहे. ती सत्य असून पुरस्कारासाठी मी त्यांची शिफारस करीत आहे.

**दिनांक :**

**प्राचार्य/संचालक/विभागप्रमुख**
**(विद्यापीठ/शैक्षणिक/प्रशासकीय)**

"प्रपत्र -अ"

# " गुणवंत सेवक पुरस्कार "
# स्वयंमुल्यांकन अहवाल.
**(संबंधित सेवकाने भरावयाची माहिती)**

## -: वैयक्तिक माहिती :-

अ)

नांव :- ______________________

जन्मतारीख :- ______________________

वय :- ______________________

सध्याचा पत्ता :- ______________________

______________________

कायमचा पत्ता :- ______________________

______________________

कामाचा विभाग :- ______________________

सध्याचे पद आणि वर्ग :- ______________________

प्रथम नियुक्तीचा दिनांक व पद :- ______________________

एकूण सेवा :- ______________________

शैक्षणिक अर्हता :- ______________________

## -: इतर माहिती :-

ब)

धारण केलेली पदे, विभाग, वर्ग व कालावधी :- ______________________

संगणकाचे ज्ञान आहे का? :- ______________________
(विशेष माहिती द्यावी)

सेवाअंतर्गत प्रशिक्षण व तपशील :- ______________________

नैतिक अध:पतन विषयक काही गुन्हयाची नोंद आहे काय? आणि तो सिध्द झाला आहे काय? ______________________

______________________

यापूर्वी मिळालेली बक्षीसे, पारितोषिके :- ______________________
सन्मान (संस्थेत व संस्थेबाहेर)

क्रीडा व सांस्कृतिक सहभाग आहे का?:- ______________________
(संस्थेत व संस्थेबाहेर)

सामाजिक कार्यात सहभाग आहे का? :- ______________________
(उदा. राष्ट्रीय एकात्मता, धर्मनिरपेक्षता प्रौढ शिक्षण, दुष्काळ निवारण, राष्ट्रीय साक्षरता अभियान इत्यादी )

इतर माहिती असल्यास :- ______________________

या पुरस्कारासाठी आपली योग्यता :- ______________________

थोडक्यात नमूद करावी.

वरील माहिती माझ्या समजुतीनुसार खरी आहे.

सही :-

नाव :- ( ______________________ )

दिनांक :-

ठिकाण :-

1/E:/MD/2012/SK/Puras/Gun.2012